# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## सभेची सूचना

विद्यापीठाच्या अधिसभेची (Senate) बैठक शुक्रवार दिनांक ३० डिसेंबर, २०१६ रोजी दुपारी १२.०० वाजता विद्यापीठाच्या **व्यवस्थापन परिषद सभागृहात** होईल. कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास, सभा अर्ध्या तासाने त्याच दिवशी त्याच ठिकाणी पुन्हा सुरु होईल.

आज्ञेवरुन,

**कुलसचिव** 19/11

विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४
क्र.शिवाजी वि./अधिसभा/ 7032
दिनांक : १९ नोव्हेंबर, २०१६

प्रति,

अधिसभा सदस्य,

(सूचना : परिनियम ४७६ च्या तरतुदीनुसार अधिसभा सदस्यांना प्रश्न विचारावयाचे असल्यास त्यांनी आपले प्रश्न व ठराव कार्यालयीन सुट्टी व्यतिरिक्त दिनांक २९ नोव्हेंबर, २०१६ पर्यंत कार्यालयीन वेळेत विद्यापीठ कार्यालयात मिळतील असे पाठवावेत.

परिनियम ४७६(२) च्या तरतुदीनुसार अधिसभेच्या बैठकीत एका सदस्याला तीनपेक्षा अधिक प्रश्न विचारता येणार नाहीत.

अधिसभेच्या बैठकीत विचारावयाचे प्रश्न हे महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ च्या कलम २६ मध्ये अधिसभेचे कार्य व कर्तव्य नमूद केले आहेत, त्यास सुसंगत असावेत व त्यास द्यावयाची उत्तरे यासंबंधीच्या परिनियम ४७६ मधील तरतूदीसंदर्भातील व मार्गदर्शक सूचनांची प्रत माहितीसाठी सोबत जोडली आहे.)

**महत्वाची सूचना :**

विचारावयाचे प्रश्न व मांडावयाचे ठराव स्वतंत्र पाकिटामधून पाठवावेत. प्रश्न/ठराव हे या संदर्भातील मार्गदर्शक सूचनेनुसार पाठवावेत.

*****